# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २३४ वा ❑ मंगळवार दि.११ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## विना मोबदला व्यवहार होत असतो काय?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

मालमत्तेच्या देवाण घेवाणीचा व्यवहार विना पैशाने होत नसतो.एखादी स्थावर किंवा जंगम मालमत्ता घ्यायची असेल तर सर्व प्रथम विकत घेणारा इसरपत्र करत असतो...

ईसार पत्र करताना व्यवहार संबंधित. मालमत्तेचे वर्णन,इसार करताना देण्यात येणाऱ्या रकमेचा व झाल्याची इसारा रकमेचा व विक्री केव्हा करणार आहे,याचा संविस्तर उल्लेख असतो.. इसार पत्रात नमूद तारखेनुसार संबंधित संपत्तीची विक्री होत असते. कोणतीही मालमत्ता खरेदी करताना या पद्धतीवर विक्रीचा व्यवहार होत असतो..

थोडक्यात काय तर, मालमत्तेचे खरेदी इसार पत्र म्हणजे मालमत्तेच्या खरेदी–विक्रीचा भविष्यात होणाऱ्या व्यवहारासाठी केलेला एक करार आहे, ज्याला साठेखत असेही म्हणतात. या करारामुळे मालमत्तेचे मालकी हक्क भविष्यात हस्तांतरित होणार आहेत, हे दर्शवले जाते, परंतु केवळ या करारामुळे खरेदीदाराला मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क मिळत नाही. मालमत्ता खरेदी–विक्रीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आणि नोंदणी कार्यालयात खरेदीखत नोंदणीकृत झाल्यावरच खरेदीदाराचा मालकी हक्क सिद्ध होतो. एकही रुपया न घेता व्यवहार झाला, असे अजित दादा म्हणत आहे..कोणत्याही व्यवहारात पैसा महत्वाचा असतो..विना पैशाने व्यवहार होत नसतो.कोट्यावधी रुपयांचा व्यवहार करताना पैसे न घेता विक्रीचे दस्त कसे तयार झाले?

अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांच्या अमेडिया एंटरप्रायझेस कंपनीने मुंढवा येथील १८०० कोटी रुपये मूल्य असलेली ४० एकर जमीन खरेदी केली आहे. खरेदी दस्तावर ३०० कोटी रुपयांचे मूल्य दर्शविण्यात येत असले, तरी प्रत्यक्षात खरेदी–विक्रीमध्ये एकही रुपयांची देवाण–घेवाण झालेली नाही. या व्यवहारासाठी केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क भरण्यात आले आहे. या अजब व्यवहारावर संपूर्ण राज्यात आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी दुय्यम निबंधकाचे निलंबन करण्यात आले असून, त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला आहे. अशा प्रकारे दस्तनोंदणी झालीच कशी, असा प्रश्न उपस्थित होत आहे..

संबंधित प्रकरणात तेजवानी; तसेच अमेडिया कंपनीचे दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला मात्र कंपनीचे मालक पार्थ पवार यांच्या वर अजून कोणताही गुन्हा दाखल झाला नाही.अजित पवार यांचे पुत्र असलेल्या पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनीने आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्यासाठी ही जमीन विकत घेतली होती. या व्यवहारात २१ कोटींचे मुद्रांक शुल्क भरणे अपेक्षित असताना फक्त ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरण्यात आली होती. या सगळ्यावरुन प्रचंड राजकीय गदारोळ निर्माण झाल्यानंतर अजित पवार यांनी आपल्याला मुलाच्या या व्यवहाराविषयी कोणतीही माहिती नसल्याचे सांगत हात झटकले. कोट्यावधी रुपयांचा व्यवहार होत असताना घरातील कर्त्या पुरुषाला माहित नाही,म्हणणे किती खरे आहे.१०० रुपयांची वस्तू घ्यायची असेल तर आपण कुटुंबातील सदस्यांशी सल्ला मसलत करत असतो..जिथे करोडो रुपयांची संपत्ती घेण्याचा व्यवहार झाला हा सर्व व्यवहार दादांना माहिती असल्याचे दादा सांगत आहे.किती हास्यास्पद आहे?मुंढवा जमीन व्यवहारात या कुठल्याही गोष्टी करण्यात आल्या नाहीत. मला हा व्यवहार झालेला माहिती नाही. नाहीतर मी सांगितलं असतं करु नका, असे अजित पवार म्हणत आहे.

एकंदरीत,मुंढवा जमीन घोटाळा हा मोठा भुखंड घोटाळा असून खरेदी दस्त जाणीव पूर्वक तांत्रिक अडचणी निर्माण करण्यात आला का?

मुंढवा येथील ही जमीन अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी असल्याने तिची किंमत कोट्यवधींमध्ये आहे. ही जमीन पार्थ पवार यांच्या अमेडिया डेव्हलपर्स या कंपनीने विकत घेतली असल्याचे कागदपत्रांवरून समोर आले आहे. मात्र, खरेदीखतावर पैसे दिल्याचा उल्लेख नसल्याने, ‘‘हा व्यवहार खरा की केवळ दाखवण्यापुरता?’’ हा प्रश्न निर्माण झाला आहे.या प्रकरणात पोलिस आणि महसूल यंत्रणा दोन्ही गोंधळात सापडल्या आहेत. पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपुरी आहेत, तर महसूल विभागाकडे या व्यवहाराचे नोंदणी तपशील आहेत. दोन्ही विभागांकडून परस्पर दोषारोप सुरू आहेत.या प्रकरणीसत्य समोर येईल काय? दोषींविरुद्ध कडक कारवाई होईल काय? पार्थ पवार यांच्या वर कारवाई होईल काय?खरेदी व्यवहार रद्द करता येतो काय? स्टॅम्प ड्युटी भरण्यात येईल काय?. संपूर्ण प्रकरणात अजित पवारांनी भूमिका नेमकी काय होती? व पुढे काय राहील? असे कितीतरी प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतात.

# गजानन मेहेंदळे जागतिक दर्जाचे इतिहास संशोधक होते - कृष्णगोपाल

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – गेल्या सुमारे एक हजार वर्षात भारतावर असंख्य आक्रमणे झाली, ज्यात असंख्य राष्ट्रभक्तांचे बलिदान झाले. त्यातूनही भक्कमपणे दिमाखाने उभे राहणाऱ्या आपल्या भारताचे सर्वांगीण संशोधन सातत्याने होण्याची गरज आहे, ज्यासाठी गजानन मेहेंदळेंसारखे संशोधक तयार व्हावेत, अशी अपेक्षा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी यांनी आज येथे व्यक्त केली.

ज्येष्ठ इतिहास संशोधक व शिवचरित्रकार गजानन भास्कर तथा गजाभाऊ मेहेंदळे यांचे १७ सप्टेंबर २०२५ रोजी अकस्मात दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी आज स्मृती संकल्प सभेचे येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी, इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्चचे (आयसीएचआर) अध्यक्ष रघुवेंद्र तंवर, भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, सचिव पांडुरंग बलकवडे, खजिनदार नंदकुमार निकम व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत उपस्थित होते.




यावेळी बोलतांना कृष्णगोपालजी यांनी गजाभाऊ मेहेंदळे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. इतिहासातील सत्य बाहेर आणण्यासाठी आयुष्यभर धडपड करणारा हा माणूस अद्वितीय होता. गजाभाऊंचे संशोधनाचे कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी इतिहासाचा धांडोळा घेतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या अद्वितीय कामगिरीचे पैलू त्यांनी उलगडून दाखवले. आपल्या देशाची, इतिहासाची आणि आपल्या संस्कृतीची प्रतिमा वाईट करण्याचे काम इंग्रजांनी जाणीवपूर्वक केले. भारताला ख्रिश्चन करण्याचे त्यांचे षडयंत्र आपल्या थोर पराक्रमी महापुरुषांनी हाणून पाडले. त्यावर विस्तृतपणे सखोल संशोधन होण्याची गरज आहे. इतिहासाचे संशोधन फक्त राजा, साम्राज्य इथपर्यंतच अपेक्षित नसून देशातील विविध मुद्यांचा सर्वांगीण बाजूने वेध घेता आला पाहिजे, म्हणजे संशोधन परिपूर्ण होऊ शकेल.

यावेळी तंवर म्हणाले की, इतिहास संशोधन हा कधीही न संपणारा विषय आहे. कोणतेही साहित्य, इतिहास जोपर्यंत इंग्रजीत प्रसिद्ध होत नाही, तोपर्यंत त्याची देशपातळीवर दखल घेतली जात नाही, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. गजाभाऊंच्या अप्रकाशित पुस्तकांसाठी आयसीएचआर देखील सहकार्य देण्यास तयार आहे.

गजाभाऊंच्या आठवणींना उजाळा देताना प्रदीप रावत यांनी भारत इतिहास संशोधक मंडळात गजाभाऊंच्या नावाने ‘‘गजानन मेहेंदळे मराठा इतिहास अध्यासन केंद्र‘‘ स्थापन करण्याची घोषणा केली. या अध्यासनात मराठा साम्राज्यातील शस्त्रास्त्रे, युध्दकौशल्य आणि दस्तऐवज यांची सर्व माहिती उपलब्ध करुन दिली जाणार आहे. तसेच इतिहास संशोधनासाठी सुरुवातीला एक लाख रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. नजीकच्या काळात त्यांनी संशोधित करून ठेवलेल्या अत्यंत महत्वाच्या ऐतिहासिक साहित्याच्या प्रकाशनाचा संकल्प यावेळी करण्यात येत असून येत्या वर्षभरात गजाभाऊंचे अप्रकाशित साहित्य ज्यात भारतावरील इस्लामिक आक्रमणांचे सर्व खंड, दुसरे महायुद्ध याचे पाच खंड प्रकाशित केले जाणार आहेत.

गजानन मेहेंदळे यांनी युद्धशास्त्र या विषयाचा सखोल अभ्यास केला होता. १९७१ च्या बांगलादेश युद्धातही त्यांनी युद्ध वार्ताहर म्हणून काम केले होते. शिवचरित्र, आदिलशाही फर्माने, शिवरायांचे आरमार, टिपू सुलतान, इस्लाम तसेच अन्य विषयांवर त्यांनी विस्तृत व सप्रमाण लेखन केले आहे. इतिहास विषयाचा चालता बोलता कोश अशीच गजानन मेहेंदळे यांची ओळख होती. अशा अनंत आठवणींना या स्मृती संकल्प सभेमध्ये उजाळा देण्यात आला. सभेचे सूत्रसंचालन निकम यांनी केले तर बलकवडे यांनी सर्वांचे आभार मानले. येत्या २० नोव्हेंबर रोजी सायं. ५.३० वाजता भारत इतिहास संशोधक मंडळात सर्वांच्या भावना व्यक्त करण्यासाठी स्वतंत्र श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बलकवडे यांनी यावेळी दिली.

## जिल्हा ग्रंथालय कार्यालयात दिवाळी अंक प्रदर्शन

ज्योतिर्मय साहित्य


**छत्रपती संभाजीनगर** – जिल्हा ग्रंथालय कार्यालय, राधामोहन कॉलनी खोकडपुरा येथे दिवाळी अंक प्रदर्शन लावण्यात आले आहे. गुरुवार दि.१३ पर्यंत हे प्रदर्शन वाचकांसाठी खुले राहणार आहे,असे जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी कळविले आहे. सेवनिवृत्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी ल. दि. कुमठेकर यांच्या हस्ते या प्रद्रशनाचे उद्घाटन (दि.७) करण्यात आले. निरीक्षक ज्ञानेश्वर पेठणे, दि.ना.काळे, अनिल कांबळे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. दिवाळी अंक वाचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी केले आहे.











## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - ८९

"वास्तुशास्त्र पेंटिंग" मध्ये आपण कुंडली शास्त्रासह नक्षत्र विज्ञान, रंग शास्त्र, अंकशास्त्र आणि मंत्रशक्तीचं शास्त्र यांचा उपयोग करतो. संपूर्ण ब्रह्मांड हे ग्रहांच्या गोचर स्थितीवर कार्यरत असते असं म्हटलं तर वावगं ठरु नये. नवग्रहांची माहिती आपल्या 'वास्तुशास्त्र पेंटिंग' मध्ये कशा प्रकारे कार्य करते, या बद्दल आपण जाणून घेवुया..!


नवग्रहांच्या प्रचलित क्रमापेक्षा आपण, नक्षत्र व ग्रह मंडलात जसं स्थान गणलं जातं त्यानुसार त्या त्या ग्रहांची माहिती आपण आपल्या लघुलेखात वाचणार आहोत. पैकी या लेखात आपण सूर्यमालेतील, पांचवा परंतु सर्वात मोठा ग्रह बृहस्पति अर्थात 'गुरु' महाराज यांच्या बद्दल जाणून घेवुया.

गुरु अर्थात शिक्षक शिकवणारा - मार्गदर्शन करणारा - ज्ञान देणारा असा जो जो आहे तो 'गुरु' या नावाने संबोधला जातो. अनेक संस्कृतीच्या पौराणिक आणि धार्मिक कथांमध्ये "गुरु" चा उल्लेख आढळतो. सप्ताहातील एका दिवसाला 'गुरुवार' या नावाने संबोधले जातो. गुरु हा पृथ्वीपासून बघितलं त्याची दृश्यप्रत -२.५ पर्यंत पोहोचू शकते. तेव्हा गुरु हा चंद्र व शुक्रा नंतरचा आकाशातील सर्वाधिक प्रकाशमान ग्रह मानला जातो. तेव्हा गुरुला त्याच्या प्रचंड मोठ्या आकारमानाचा स्वत:भोवती फिरण्यावर विशेष परिणाम होत नाही. त्याला स्वत:भोवती फिरण्यासाठी केवळ दहा तासांहून किंचित कमी वेळ लागतो.

स्वत:भोवती फिरणं वा प्रदक्षिणा घालणं आणि आरती झाल्यानंतर "घालीन लोटांगण..." म्हणत स्वत: भोवती तीन प्रदक्षिणा घालणं, यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. या पुढील कधीतरी लिखाण होईलच. आता या लेखा पुरतंच लिहायचं झाल्यास 'गुरु' महाराजांचं स्वत: भोवती प्रचंड गतीने फिरणं या क्रियेचा आपण आपल्या "वास्तुशास्त्र पेंटिंग" मध्ये उपयोग करुन घेत असतो. लालसर, तपकिरी रंगाचा प्रभाव गुरुवर पडलेला आहे. गुरुवर एक लाल डाग पण आहे. हा डाग म्हणजे पृथ्वीच्या आकारापेक्षा मोठे वादळ आहे. शनि ग्रहा प्रमाणेच गुरू भोवतीही एक धूसर मात्र तीन हिस्से असलेले कडे आहे. हिंदु ज्योतिषा मध्ये गुरुला, बृहस्पति म्हटलेले आहे. बृहस्पती हा देवाचा शिक्षक आहे. आपल्या प्रत्येक "वास्तुशास्त्र पेंटिंग" मध्ये गुरुचं स्थान शिक्षकाचंच आहे.

क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

दिवाळसणाला
नको रुसु सुनबाई
तुच घरची लक्ष्मी
सण चुकायचा नई ||३४०||

दिवाळसणाला
गायी संग वासरू
माय ममतेचे रूप
आज पुजा करू ||३४१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# सिद्धिविनायकाचे विलोभनीय दर्शन



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२


ज्योतिर्मय साहित्य

तेरा आणि चौदा ऑगस्ट हे (२०२४) दोन दिवस अत्यंत संस्मरणीय असे ठरले. सांगलीला काही कौटुंबिक कार्यक्रमानिमित्त जाणे झाले. या दोन दिवसात सहकुटुंब देवदर्शनाचा लाभ घेता आला आणि खरोखरोच खूप प्रसन्न वाटले. या दोन दिवसात सांगलीतील प्रसिद्ध गणपती मंदिर, नरसोबा वाडी, जयसिंगपूर येथील सिद्धिविनायकाचे मंदिर आणि चाफळ येथील श्री राम मंदिर यांचं दर्शन घेण्याचं भाग्य लाभलं. पण आज मी प्रामुख्याने बोलणार आहे ते जयसिंगपूर येथील सिद्धिविनायक मंदिराबद्दल.

जयसिंगपूर येथील माझे मित्र श्री मदन बुरांडे मला अनेक दिवसांपासून घरी या म्हणून बोलावत होते. १४ ऑगस्टला तो योग अचानक आला. सांगलीपासून अवघ्या ११ किमी वर जयसिंगपूर आहे. छत्रपती शाहू महाराजांचे वडील राजे जयसिंग यांचे नाव या गावाला देण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात हे गाव आहे. कोल्हापूरपासून जयसिंगपूर अवघ्या ३८ किमी अंतरावर आहे. शहराच्या पूर्वेला कृष्णा नदी वाहते. हे शहर तंबाखू, गूळ, मिरची आदींच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. दूध, दुधाचे पदार्थ या ठिकाणी उत्तम मिळतात. फळे, भाजीपाला यांचीही चांगली आवक आहे. दळणवळणाच्या दृष्टीने हे शहर राज्याशी आणि देशाशी एस टी आणि रेल्वे सेवेने जोडले गेले आहे. विविध प्रकारचे शालेय, महाविद्यालयीन आणि व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक उत्तम शैक्षणिक संस्था या शहरात आहेत.



मदनजी यांच्याकडे जाण्यापूर्वी त्यांना फोन केला होता. मी, सौ. श्रद्धा आणि माझी कन्या चि. सौ सारिका असे आम्ही तिघेजण सकाळी लवकरच जयसिंगपूरला पोहोचलो. श्री मदनजी आणि सौ वहिनी आमची वाटच पाहत होते. पहिल्यांदाच त्यांच्या घरी गेल्यामुळे त्यांना खूप आनंद झाला. त्या दोघांनी आमचे मनापासून स्वागत आणि उत्तम असे आदरातिथ्य केले. नंतर श्री मदनजी म्हणाले इथून जवळच सिद्धिविनायकाचे अतिशय सुंदर मंदिर आहे. तुम्ही ते पाहिल्याशिवाय जाऊ नका. त्यांच्या प्रेमळ सूचनेनुसार आम्ही सिद्धिविनायकाचे दर्शन घ्यायचे ठरवले. आमच्यासोबत ते स्वतः मंदिर दाखवण्यासाठी आले. त्यांच्या घरापासून साधारण एक दीड किमी अंतरावर मौजे आगर, जयसिंगपूर येथे हे मंदिर आहे. दुरूनच हे मंदिर आपले लक्ष वेधून घेते. सिद्धिविनायक ट्रस्टने या मंदिराची निर्मिती केली आहे. दुरून ऑक्टोपसच्या आकाराचे दिसणारे पण कमळाच्या पाकळ्यांचा आकार असलेलं हे मंदिर खरोखरच आगळंवेगळं आहे. अशा प्रकारचं मंदिर महाराष्ट्रात तरी माझ्या पाहण्यात नाही. या मंदिराच्या बांधणीतील कल्पकता आणि बांधकामातील कौशल्य अप्रतिम आहे. आज कोणतीही वास्तू बांधताना साधारणपणे लोखंड आणि सिमेंट यांचा वापर केलेला आपल्याला आढळतो. त्याशिवाय कोणतेही बांधकाम पूर्ण होत नाही. पण हे मंदिर मात्र सिमेंट आणि स्टील यांच्या वापरापासून मुक्त आहे. दगड, विटा आणि चुना या नैसर्गिक गोष्टींचा वापर करून हे मंदिर बांधण्यात आहे. **(क्रमशः)**





दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# मायोद्भवनिरूपण


ज्योतिर्मय साहित्य

तत्वे आणि मी पणा दोन्ही विनाशी व दृष्य असल्याने तत्वांचा निरास झाला की मीपणा संपतो. मग निर्गुण आत्मा तेवढा शिल्लक रहातो. तेव्हा ''सोहं म्हणजे मी तोच आहे'' अशा आत्मनिवेदनाचा साक्षात अनुभव येतो. एकदा का तुम्हाला हे आत्मनिवेदन घडले म्हणजे ''देव व भक्त'' एकरूप होऊन जातात.''देवरूप होऊ सगळे'' याची प्रचिती येते.

निर्गुण रूपाला जन्ममरण नाही, पापपुण्य नाही जो निर्गुण निराकार असतो तो या मायेच्या विळख्यातुन मुक्त होतो. जीव विनाशी तत्वांनी वेढलेला असतो, त्यामुळे तो संशयाच्या चक्रांत अडकतो.स्वतः ला विसरतो आणि ''कोहं'' म्हणजे मी कोण आहे असे विचारू लागतो. जीव जोपर्यंत तत्वामध्ये गुरफटलेला असतो तोपर्यंत मी कोण आहे असे विचारतो. त्यालाच शंका निर्माण होते तो स्वतः शंकेचे अभ्यासाने निरसन करतो तेंव्हा''मी तोच आहे'' असा जीवाला अनुभव येतो अखेर आत्मस्वरूपाशीं एकरूप होऊन ''मी तूं पणाचा भेदाचे निरसन झाले की अहं --सोहं हा भेद ऊरत नाही. अशा रितीने सर्व अवस्थांच्या पलीकडे रहाणारा तो

''परमात्मा''ओळखावा व त्याच्या आज्ञेनुसार वागावे हेच तर संसाराचे सार आहे.

समास तिसरा समाप्त
श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ



# नामाविषयी शुद्ध भाव आवश्यक

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

ईश्वर सर्वांचा उत्पन्नकर्ता आहे, रक्षणकर्ता आहे, तसेच संहारकर्ताही आहे. परंतु तरी त्याला न्यायी आणि प्रेमी म्हणतातच, कारण तो नि:स्वार्थी आहे. म्हणजे प्रेम हे नि:स्वार्थातच असते. आपल्याला खरे म्हटले म्हणजे आपला स्वार्थच नडतो. आपला स्वार्थ प्रेमाच्या आड येतो. आपले विषय ईश्वर-प्रेमात व्यत्यय आणतात. ज्या ज्या गोष्टी या प्रेमाच्या आड येतात त्यांचा त्याग नको का करायला ? तेव्हा विषयांची आसक्ती, त्यांच्यावरचे प्रेम, नाहीसे झाले पाहिजे. आपण ईश्वराचे, संतांचे झाले पाहिजे. त्याशिवाय आपल्याला कशाचीही गरज वाटता कामा नये.

एकाच मातीचा जसा गणपती, बाहुले किंवा मडके होते, त्याप्रमाणे ईश्वरही आपल्या भावनेप्रमाणे होतो. म्हणूनच आपला भाव नेहमी शुद्ध आणि नि:स्वार्थी असावा. मुळाशी पाणी घातले की झाड वाढते, पण आपण मुळापर्यंत जातच नाही. तेव्हा, भाव शुद्ध कसा होईल ते पाहावे. उदाहरणार्थ, एकादशीच्या दिवशी उपवास करायचा एवढेच आपल्याला ठाऊक असते. पण एक गृहस्थ एकादशीला भगवंताचे नामस्मरण करायचे सोडून बारा वाजेपर्यंत अंघोळ न करता अंगण, मोरी झाडत बसला ! असे आमुचे चुकते. थोडक्यात म्हणजे, आपल्याला मुळात काय पाहिजे हेच कळत नाही. कावीळ झाली म्हणजे डोळ्याला खरे रूप कसे कळणार ? म्हणून, ज्याचे डोळे साफ आहेत तो सांगेल त्याप्रमाणे वागावे. याकरिता गुरु-आज्ञा प्रमाण मानून आपण वागत जावे. नाम श्रद्धेने आणि शुद्ध भावाने घ्यावे म्हणजे मनात शंका येत नाहीत. या भगवंताच्या नामाची गोडी एकदा लागली म्हणजे भगवंत नाही आपल्याला सोडीत. नामाशिवाय दुसरे सत्यच नाही अशी दृढ भावना झाली पाहिजे. जितकी देहबुद्धी अधिक तितके नाम अधिक घेतले पाहिजे. आज इतके दिवस आपण विषयाचे चिंतन केले, त्याने आपल्या हातात काय आले ? नामासारखे सोपे साधन नाही. प्रापंचिक लोक असे म्हणतात की, ''विषयाचा अनुभव तात्काळ येतो, पण भगवंताचा अनुभव हा अनुमानाचा आणि श्रद्धेचा आहे.'' हे त्यांचे म्हणणे मला पटते. प्रापंचिक लोक प्रपंच सोडीत नाहीत याचे मला नवल वाटत नाही. पण ते सुख चिरकाल टिकणारे आहे ही समजूत करून घेऊन त्यामध्ये रमतात, याचे मला वाईट वाटते. मी असे म्हणतो की, तुमच्या अनुभवाप्रमाणे जे खरे आहे, तेवढेच तुम्ही खरे माना. विषयाच्या ध्यासापासून सुख नाही असे वाटू लागले म्हणजे नामाची गोडी येईल. आपल्या देहावर आपली सत्ता नाही, आपल्या पैशावर आपली सत्ता नाही, आपल्या माणसांवर आपली सत्ता नाही. म्हणून आपले कर्तव्य तेवढे करावे, आणि ते करीत असताना आपले मन दुश्चित्त होऊ देऊ नये.

भगवत्प्राप्ती हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आपण नेहमी त्याच्याभोवती फिरत असावे; म्हणजेच त्याच्या अनुसंधानात असावे.



# शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे,
नागपूर

## सहावं वरीस धोक्याचं?

ज्योतिर्मय साहित्य

काँन्व्हेंटच्या शाळा आल्या. यातही काही शाळा किस्तवार शुल्क आकारुन शाळा चालवतात. काही शाळा माफक शुल्क घेतात. काही मात्र जास्त. परंतू आज ते शुल्क कमी आहे. त्यातच त्यांची एवढी जाहीरात आहे की सर्व लोकं मग ते कितीही गरीब का असेना, काँन्व्हेंटलाच टाकतात. त्यातच तो दिवस दूर नाही की सर्व पालक आपल्या पाल्यांना काँन्व्हेंटला टाकतील व मराठीच्या शाळेत मुलंच मिळणार नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही लक्षात घेण्यासारखी आहे की आज मराठीच्या अनुदानीत शाळेत कितीही का असेना मुलं आहेत. परंतू ज्यावेळी मराठीच्या अनुदानीत शाळा बंद पडतील, त्यानंतर काँन्व्हेंटच्या शाळेचं शुल्क एवढं भरमसाट वाढेल की गरीब लोकं आपली मुलं शिकवू शकणार नाहीत. ते आंदोलन करतील. परंतू त्याचा उपयोग होणार नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.


आज गरीबीचा आकडा व अनुदानीत शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा आकडा जास्त आहे. सरकार हा आकडा कमी व्हावा यावर वेळोवेळी प्रयोग करुन प्रयत्न करीत आहे. ती बाब आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण विचारशील व्यक्तीमत्वाचे असलो तर तेवढ्या चिकीत्सक विचारसरणीचे नाही. सरकारनं याच व्यापारीक विचारानं पेन्शनवर कु-हाड चालवली आणि हळूच शाळेच्या अनुदानावर. ब-याच दिवसापासून नान सॅलरी ग्रँडही बंद आहे. आर टी ई चे पैसे देवू केले. परंतू कोणत्याही शाळेला मिळाले नाही. हा व्यवहारीक बदल काय दर्शवतो? ही विचार करणारी बाब आहे.

विशेष गोष्ट अशी की आज जो पालक साक्षर आहे, त्याला सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण कळत जरी असलं तरी तो आपल्याला काय करायचंय असा विचार करतो. जो अज्ञानी पालक आहे, त्याला या गोष्टी कळत नाही. जो अल्पशिक्षीत आहे, परंतू त्याचेजवळ भरमसाठ पैसा आहे, तो पालक चिकीत्सक जरी असला तरी तो विचार करतो की आपल्याला काय घेणंदेणं आहे. मरणं मात्र गरीबांचंच आहे.

विशेष गोष्ट ही की वय वर्ष सहा हा शाळा प्रवेशाचा आकृतीबंध पेन्शन बंदसारखाच आकृतीबंध वाटतो. काल पेन्शनधारकांची पेन्शन बंद झाली. उद्या गरीबांच्या शाळा बंद होतील यात शंका नाही. सरकार पुरेपूर स्वरुपात खाजगीकरण करण्यासाठीच लागलं आहे. ही निर्वीवाद सत्य बाब आहे. यामुळं वेळीच सावध व्हावे. नाहीतर तेल गेलं तूप गेलं, हाती धुपाटणं आलं अशी अवस्था देशातील गरीबांची निर्माण होवू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. वय वर्ष सहा, ही विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी चांगली बाब आहे. परंतू ती बाब विचारात घेऊन सरकारनं पदड्यामागचं राजकारण करु नये. गरीबांच्या शाळा बंद करु नये म्हणजे झालं.



# || अभंग-माधव ||



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

|| ♦ अभंग ♦ ||

चित्ती नसे सुख । कोमेजले मुख ।
लागे तुझी भूक । विठुराया ॥१॥
तिकडे तू उभा । आहे विटेवरी ।
आपुली ही दूरी । साहवेना ॥२॥
पोटी घाल माझ्या । पापांचा हा घडा ।
घातला उपडा । तुझ्यापुढे ॥३॥
माझ्या या जन्मीची । पापे अति घोर ।
तरी कर पार । नौका माझी ॥४॥
माधव हा म्हणे । आलो मी शरण ।
वंदू दे चरण । आता तुझे ॥५॥



# आरोग्य संजीवनी

## कँल्शियमची कमतरता

ज्योतिर्मय साहित्य

शरीरातील कॅल्शियम हे विटामिन डी. थायराइड ,हार्मोन्स आणि कॅल्सीटोनील याद्वारे नियंत्रित केले जाते. त्यामुळे शरीरातील व रक्ताची कॅल्शियमचे प्रमाण नेहमी योग्य राहते विटामिन डी आतड्यातील व किडनीतील कॅल्शियम रक्तामध्ये शोषून घेण्यासाठी मदत करते. आपल्या शरीराला विटामिन डी ही कोवळ्या सूर्यप्रकाशातून मिळत असते .विटामिन डी च्या कमतरतेमुळे हाडातील कॅल्शियम कमी होऊन हाडे ठिसूळ होतात. याशिवाय आहारातून कॅल्शियम युक्त पदार्थांचे सेवन न करणे, पचनशक्ती मंदावणे यामुळे आहारातील कॅल्शियमची शोषण कमी होते तसेच स्त्रियांना मासिक पाळीत अतिरिक्त स्त्राव होणे, स्त्रियांची मासिक पाळी येणे बंद झाल्यानंतर हार्मोनचे संतुलन बिघडणे व ऊन आणि शारीरिक श्रमांचा अभाव, गोड पदार्थांची अति सेवन करणे ,नवजात बालकांना मातेचे दूध न मिळणे यामुळे देखील कॅल्शियमची कमतरता निर्माण होते .प्रत्येक स्त्रीमध्ये मासिक पाळी बंद झाल्यानंतर शरीरातील हार्मोन्सची संतुलन बिघडल्याने संपूर्ण शरीरातील हाडे ठिसूळ लागतात. या दिवसांमध्ये फक्त आहारातून कॅल्शियम घेऊन पूर्तता शकत नाही त्यासाठी आयुर्वेदिक कॅल्शियमची औषधे घेणे गरजेचे असते अन्यथा स्त्रियांच्या शरीरातील हाडे ठिसूळ होऊन थोडाश्या आघाताने देखील भग्न होऊ शकतात .

अनेक स्त्रियांना हाता पायांना मुंग्या येणे, मणक्याचे विकार उद्भवणे,मान व कंबर दुखणे, सकाळी उठताना त्रास होणे, चालताना त्रास होणे ,मांडी घालून जास्त वेळ बसू न शकणे. शौचाला बसता न येणे ,चक्कर येणे, गुडघेदुखी ,लवकर थकवा येणे ,दात दुखणे, नखे ठिसूळ झाल्याने तुटणे, केस गळणे, सतत भीती वाटणे, ताण तणाव जाणवणे ,स्मरणशक्ती कमी होणे व झोप न लागणे अशा अनेक प्रकारच्या त्रासांना तोंड द्यावे लागते तथापि बहुतांश स्त्रियां त्याकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात .

स्त्रियांनी वयाच्या पन्नाशीनंतर आहारात कॅल्शियम पदार्थांचे प्रमाण वाढवावे.त्यासाठी कँल्शियम युक्त आहाराचे सेवन करावे.पुढील पदार्थ हे कँल्शियमयुक्त असतात. त्यांचा आहारात समावेश करावा.

गहू, बाजरी ,नाचणी, दूध व दुधाचे सर्व पदार्थ, मुगडाळ ,सोयाबीन, वाटाणे, मटकी, राजमा, कढीपत्ता, कोबी, मेथी, मुळ्याची पाने, पुदिना, कोथिंबीर ,काकडी, गवार ,टोमॅटो, मनुका, बदाम, पिस्ते, अक्रोड, खरबुजाच्या बिया, नारळ, आंबा, सिताफळ, संत्रा ,अननस ,ओवा ,जिरे, हिंग, लवंग, व काळे मिरे या पदार्थांचा आहारात समावेश असावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कँल्शियम वाढण्यासाठी घरगुती उपाय

सकाळी एक ग्लास ताज्या ऊसाच्या रसामध्ये एक गुंज चुना टाकून प्यावा.

जेवणानंतर नागवेलीचे ( खायचे )पान व चुना खावा.

रात्री झोपण्यापूर्वी ऊक ग्लास दूधात गूळ टाकून प्यावा.

सुरमई माशाचे सेवन करावे.

बदाम ,सुके अंजीराचे सेवन करावे.

आहारात भेंडीच्या भाजीचे सेवन जास्त करावे.

स्वयंपाकात तीळ तेलाचा वापर करावा.

रोज आवळ्याचे सेवन करावे

एक ग्लास पाण्यात एक चमचा जिरे टाकून उकळून घ्यावे व थंड झाल्यावर सकाळी व सायंकाळी प्यावे.

बाभळीच्या बियांचे सूक्ष्म चूर्ण तूप व मधासोबत घ्यावे.

बाभळीच्या डिंकाचे चूर्ण तूप साखरेसोबत घ्यावे.

एक कप दूधात एक चमचा बडिसोप टाकून दूध उकळुन घेऊन त्यामध्ये एक चमचा बाभळीच्या डिंकाचे चूर्ण टाकून ढवळून थंड झाल्यावर घ्यावे.

वयाच्या पन्नाशी नंतर स्त्रियांना तसेच पुरुषांना देखील कँल्शियम ची कमतरता असतेच. तथापि त्याकडे दुर्लक्ष करणे खूपच नुकसान दायक ठरू शकते. तेव्हा पन्नाशी नंतर प्रत्येक व्यक्ती ने त्यासाठी आयुर्वेद तज्ञांच्या सल्ल्याने औषधोपचार घेतल्यास वृध्दत्व सुखकर होते हे नक्कीच.



# राक्षसभुवन

## वरदसुत-दत्तस्थान

योगिराज डोळे
राक्षसभुवनकर
संपर्क 9420224999

ज्योतिर्मय साहित्य

आध्यात्मिक महत्त्व :

दत्तात्रेयांच्या कृपेने भूतबाधा, करणी आणि मानसिक व्याधी यांनी त्रस्त असलेल्या व्यक्तीने या ठिकाणी येऊन एकनिष्ठेने सेवा केल्यास ती व्यक्ती १ मासात (महिन्यात) ठीक होते. येथे लांबून येऊन लोक सेवा करतात आणि तृप्त होतात.

साजरे होत असलेले उत्सव

चैत्र कृष्ण पक्ष सप्तमीला येथे यात्रा भरते, तसेच छबीना आणि पालखी निघते. येथे धार्मिक कार्यक्रम होतात. येथे दत्तजयंती, श्रीकृष्ण जयंती आणि सर्वज्ञ चक्रधरप्रभु जयंती असे उत्सव साजरे केले जातात.

दत्तजयंतीला ७ दिवस आधी सप्ताह असतो. चतुर्दशीला दत्तात्रेयांचा जन्म होतो. पौर्णिमेला यात्रा उत्सव होतो आणि सप्ताहाची समाप्ती होते. 'दत्त महाराजांच्या कृपेने अनेक मानसिक रुग्ण बरे होतात', असा अनेक भाविकांचा अनुभव आहे.

दत्तगुरूंचे वामकुक्षी घेण्याचे ठिकाण :

श्री पांचाळेश्वर मंदिराच्या उजवीकडे, म्हणजे आपल्या डाव्या बाजूला श्री दत्तगुरूंचे वामकुक्षी घेण्याचे, म्हणजे दुपारच्या भोजनानंतर डाव्या अंगावर पहुडून विश्रांती घेण्याचे स्थळ आहे. येथे सुंदर मंदिर बांधलेले आहे. मंदिराच्या अवतीभोवती डौलदार वृक्ष आहेत. सभोवताली भक्कम तटबंदी आहे. मंदिराच्या समोर भव्य प्रवेशद्वार आहे. त्यावर नगारखाना बांधलेला आहे.

महाराष्ट्रात, मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन हे शनीदेवांचे भारतातील साडेतीन पीठापैकी एक पुर्ण पीठ आहे. त्या जवळच पांचाळेश्वर हे दत्त स्थान आहे. औरंगाबाद-बीड-सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वर औरंगाबाद पासून१०० कि. मी.अंतरावर राक्षसभुवन फाट्यापासून काही अंतरावर हे क्षेत्र आहे.

येथे दत्तजयंती उत्सव ६ दिवस फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो

***

# निक्को- जपान : निसर्ग, संस्कृती आणि स्मरणात राहणारा प्रवास

ज्योतिर्मय साहित्य

आम्ही जपान मध्ये राहत होतो तेंव्हाची गोष्ट. एकदा आम्ही ५ फॅमिली मिळून वीकेंड ला फिरायला जायचे ठरवले. कुठे जायचे यावर बराच वेळ चर्चा झाली. आणि मग ठरले निक्को ला जायचे. आम्ही रहात होतो तिथून ते खूप दूर होते. पण सगळ्यांनी ठरवले पहाटेच निघायचे. जपान मध्ये तेंव्हा भारतीय पदार्थ मिळत नसत. फारच क्वचित ठिकाणी भारतीय रेस्टॉरंट असायचे. त्यामुळे सगळ्यांनी घरूनच काहीतरी करून न्यायचे असे ठरले. पहाटे ३ लाच उठून मी सगळ्यांसाठी समोसे बनवले. कोणी पराठे, कोणी इडली असे सर्वांनी काही ना काही भारतीय पदार्थ बनवले. डबे भरले, सॉस, ब्रेड, बिस्किटे अजून बरेच काही सोबत घेतले. पहाटे ५:३० लाच घरातून निघालो. मेट्रो, टॅक्सी असे करत करत आम्ही निक्को च्या जवळ पोहोचलो. वर जाण्यासाठी बसेस होत्या. घाटातील रस्ता, निसर्ग सौंदर्य तर सगळीकडे भरभरून वाहत होते. मित्रमैत्रिणींसोबत गप्पा मारत प्रवास कधी संपला कळलेही नाही.

निक्को हे जपानच्या तोचिगी प्रांतातील एक प्रसिद्ध शहर आहे, जे तिथल्या निसर्गसौंदर्यासाठी जगभर नावाजले गेले आहे. ''निक्को'' या नावाचा अर्थच सूर्यकिरणांचा प्रकाश असा होतो, आणि तिथल्या निसर्गातही अगदी प्रकाशमान सौंदर्य अनुभवता येते. हे शहर निक्को नॅशनल पार्कच्या प्रवेशद्वारावर आहे आणि हिरवीगार पर्वत, दऱ्या, तलाव, दलदली, आणि धबधबे यांसारखी अनेक नैसर्गिक दृष्ये इथे पाहायला मिळतात. निक्को नॅशनल पार्क हे जपानच्या पहिल्या राष्ट्रीय उद्यानांमध्ये गणले जाते, आणि पर्वतीय भूभागात पसरलेले आहे.

भव्य दिव्य पर्वत रांगा, आणि त्यावर पसरलेली रंगीबेरंगी पानांची झाडेच झाडे. जणु काही कोणत्यातरी कार्यक्रमासाठी छान रंगीत कपडे घालून तयार आहेत पर्वत. त्यांच्या मधूनच पुढे सरकणारे शुभ्र ढगांचे पुंजके. काही तासांचा बस चा प्रवास झाल्यावर आम्ही अगदी वर आलो तिथे एक सुंदर तलाव होता. एवढ्या उंचीवर असलेला तो तलाव, गारठून टाकणारे थंड वारे. इतके मनमोहक दृश्य होते की शब्दात वर्णन करणे खूपच अवघड आहे. तलावाच्या काठावर आम्ही बसलो होतो. अगदी आमच्या आजूबाजूलाच ढग फिरत होते. असे वाटत होते आम्ही आकाशातल्या तलावाकाठी बसलोय.



या तलावाचे नाव लेक चुजेनजी. हा जपानमधील सर्वात उंच नैसर्गिक तलाव आहे, आणि त्याच्या सभोवती माउंट नानतायचे भव्य दृश्य पाहायला मिळते.

ते दृश्य इतके स्वप्नवत होते की विश्वास बसत नव्हता की आम्ही खरेच तिथे आहोत. तिथले निसर्गसौंदर्य अनुभवताना सगळेच निः शब्द झाले होते. कितीतरी वेळ आम्ही या स्वर्गीय निसर्गाचा आस्वाद घेत बसुन राहिलो. थोड्या वेळाने आम्ही सर्वांनी मिळून पेटपूजा केली आणि तिथली अजून काही ठिकाणे पाहण्यासाठी निघालो.

इथे माउंट शिराने आणि माउंट नानतायसारखे भव्य पर्वत, अल्पाइन वनस्पती आणि विविध प्राणी यांचे अस्तित्व दिसते. ओकुनिक्को भागातलं सेनजोगाहारा पठार, युकावा नदी, ओदाशिरोगाहारा पठार, माउंट नानताय, लेक चुजेनजी आणि केगोन फॉल्स ही ठिकाणे अत्यंत आकर्षक आहेत.

निक्कोमध्ये भटकंतीसाठी अनेक मार्ग उपलब्ध आहेत. दिवसभर आम्ही ट्रेकिंग चा आनंद घेतला. शरद ऋतूमध्ये, जपानमधील सर्वोत्तम रंग बदलणाऱ्या वृक्षांची पाने इथे पाहायला मिळतात. नंतर आम्ही केगोन धबधबा, रयुजू फॉल्स अशी अनेक ठिकाणं पाहिली. सुमारे ९७ मीटर उंच असलेला केगोन धबधबा जपानमधील सर्वात सुंदर धबधब्यांपैकी एक आहे. रयुजू फॉल्स या धबधब्याचा आकार ड्रॅगनच्या डोक्यासारखा दिसतो, आणि हिवाळ्यात किंवा शरद ऋतूत आजूबाजूच्या वृक्षांच्या रंगीबेरंगी पानांनी सुंदर दृश्य तयार होते.



शीतल गायकवाड, पुणे
(मोबाईल: 9923175624)

निक्को हे फक्त निसर्गरम्य नाही, तर जपानच्या सांस्कृतिक इतिहासातही याचे महत्व आहे. इथे ताशोगू मंदिर, फुतारासन-जिंजा आणि अनेक शिंतो व बौद्ध मंदिरे आहेत. अजोड वास्तूशिल्प, सोन्याचे नक्षीकाम, आणि पूजास्थळे, हे सगळं भव्य हिरव्यागार झाडांमध्ये वसलेले आहे. निक्कोमध्ये भेट दिल्यावर तुम्ही निसर्ग, पर्वत, ताज्या पाण्याचे तलाव, रंगीबेरंगी पाने, साधना आणि जपानची प्राचीन सांस्कृतिक परंपरा यांची अनुभूती घेऊ शकता. त्यामुळे, ''केक्को'' म्हणजे अप्रतिम ही संज्ञा खरोखर निक्को पाहिल्यावरच मिळते असे जपानमध्ये म्हणतात.

निक्को मधील नैसर्गिक हॉट वॉटर स्प्रिंग्स हेही एक विशेष आकर्षण आहे. येथे निसर्गरम्य वातावरणात वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी समृद्ध अशा अनेक हॉट स्प्रिंग्स आहेत. ऑनसेन' म्हणजे या गरम पाण्याची आंघोळ. या पाण्यामुळे शरीराला ताजेतवानेपणा मिळतो, त्वचेला सौम्यता लाभते आणि प्रवाशांना विश्रांतीचा अद्भुत अनुभव मिळतो.

इतका छान दिवस मित्रमैत्रिणींच्या आणि निसर्गाच्या सान्निध्यात घालवून, असंख्य आठवणी मनात साठवून, रात्री आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. तुम्ही कधी जपानला फिरायला जाणार असाल तर एक तरी दिवस नक्कीच निक्को साठी राखून ठेवा.

# सब कुछ संकर्षण कऱ्हाडे

ज्योतिर्मय साहित्य

बायको गोड आवाजात म्हणाली, चला हो आज नाटक पहायला जायचे आहे. कुटुंब कीर्तन हे नाटक खूप छान आहे असे ऐकले आहे,पूर्ण संसार आणि कुटुंबावर आहे. आणि विशेष म्हणजे तुमचा आणि माझा आवडता अभिनेता संकर्षण कऱ्हाडेचे आहे. आता एवढं सारं, ३३ वर्षाच्या सहजीवनांनतर गोड आवाजात म्हटल्यावर, नाही कसे म्हणू तिला? म्हणून मी ऑनलाईन तिकिटे बुक केली.

आता पुण्यात नाटक म्हणजे नक्कीच चांगले नाटक असले की हाऊसफुल होतंच, हे वेगळं सांगायला नको. मग आम्ही उभयता गेलो नाटक पहायला, कुटुंब कीर्तन. तसा नाटकाच्या नावावरून या नाटकात नक्कीच मजा मजा असणार? हे काही वेगळं सांगायला नको. खरं तर आमच्या परभणीचा संकर्षण कऱ्हाडे म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होय. उत्कृष्ट कवी तर तो आहेच पण त्यातील लेखक सुद्धा प्रचंड उद्बोधक आहे, नाटकात काय काय पेरायचं? रोजच्या जीवनातील लहान सहान गोष्टी हेरून त्या नाटकात रंगवून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्याचे कसब संकर्षणने चांगलेच आत्मसात केले आहे.

मी परभणीला बीएसएनएल मध्ये असताना संकर्षणचे बाबा, श्री गिरीश कऱ्हाडे एसबीएच मध्ये मॅनेजर होते. बँकेत काही नव्या स्कीम



आल्या की मला फोन करून बोलावून घेऊन एखादया स्कीममध्ये गुंतवणूक करून घेण्यास सांगत असत. त्यांनी मला बऱ्या पैकी फायदा करून दिलेला आहे.

परभणीचा माझा शालेय मित्र किशोर पुराणिक हा एक जबरदस्त नाट्यकलावंत आहे. गिरीश कऱ्हाडे, किशोर पुराणिक तेंव्हा पासून नाटकात एकत्र काम करत. आजही वेळेप्रमाणे ते काम करत असतात. संकर्षण लहान होता. हळूहळू संकर्षणने नाटकात, टीव्ही स्टार, सिने अभिनेता म्हणून आपला चांगलाच जम बसविला आहे. नाटक करता करता तो कवी, लेखक, आणि लोकप्रिय अभिनेता कधी बनला ? हे सांगणे अवघडच आहे. तर अश्या या हरहुन्नरी अष्टपैलू संकर्षणेचे नाटक कुटुंब कीर्तन पहायला मी आणि बायको गेलो. योगायोगाने ०९ नोव्हेंबरला या नाटकाचा शंभरावा प्रयोग होता. प्रेक्षकांनी बालगंधर्व रंग मंदिर हाऊसफुल झालं होतं. कुटुंब कीर्तन या नाटकात एक संस्कारिक आई, तिचा लाडका कीर्तनकार मुलगा पुंडलिक, मग या कीर्तनकाराचे नको नको म्हणता होणारे लग्न, मिळणारी या पिढीतील बायको शिवानी, मग घरातील सासू सुनेचे एकमेकीवर कुरूघोडी करण्याचे प्रकार, त्यामुळे वैतागलेला पुंडलिक आणि त्याने विठ्ठलापुढे केलेल्या मागण्या,

मग आईला आजी व्हायची होणारी गडबड, सुनेला लागणारे अंडे खाण्याचे डोहाळे आणि आई आणि बायकोच्या तावडीत अडकलेला पुरुष हे सारं प्रत्यक्ष पाहताना येणारी मजा, काही भावनिक क्षण सोडता जवळ जवळ पूर्ण नाटक प्रेक्षकांना मनसोक्त हसू आणते. या नाटकात आईची, सासूची भूमिका ज्येष्ठ लोकप्रिय अभिनेत्या वंदनाताई गुप्ते यांनी अतिशय जबरदस्त पद्धतीने साकारली आहे. एक आई, एक सासू कशी असते? ही पाहण्याची मजा औरच आहे. तिच्या पुत्राचा रोल पुंडलिक अर्थात संकर्षणने इतका सहज आणि अप्रतिम रंगवला आहे की, त्याला तोड नाहीच. शब्दफेक, संवाद, चेहऱ्यावरील हावभाव, त्यातून कीर्तनकार म्हणून समाजाला दिला जाणारा सहज संदेश, आणि नवरा बायको मधील नातं, कोट्या हे सारं पहायचे असेल तर कुटुंब कीर्तन हे नाटक कुणीच मिस करू नये.



गिरीश खं.वसेकर (देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे मो.९४२२६५९४००

या नाटकात संकर्षणच्या पत्नीची भूमिका शिवानीने (तन्वी मुंडले) खुप सहज आणि सुंदरतेने वठवली आहे. तिच्या बाबांची भूमिका अमोल कुलकर्णी यांनी ही खूप सहज आणि छान पद्धतीने साकारली आहे. पडद्याआड अनेक हात काम करत असतात. येथेही आहेत त्यांनी ही योग्य ती सहजता या नाटकात यावी म्हणुन मदत केली आहेच पण प्रत्यक्ष फक्त चार कलावंतानी कुटुंब कीर्तन या नाटकात धमाल उडवून दिली आहे, नाटकाला न्याय ही दिला आहे, तरीही या नाटकात सबकुछ संकर्षणच आहे, नाटक संपल्यावर ज्येष्ठ अभिनेत्या, वंदनाताई गुप्ते सर्व प्रेक्षकां समोर म्हणाल्या की, संकर्षण हा रंगमंचाचा हिरा आहे. यातच सगळं आलं. तर कुणीही मिस करू नये असे जबरदस्त नाटक आहे. वेळ काढून अवश्य पहावे असे हे नाटक म्हणजे कुटुंब कीर्तन होय.



## श्रीयश फार्मसीत 'आविष्कार २०२५' स्पर्धेचे यशस्वी आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश इंस्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छ. संभाजीनगर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेकनॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरे ह्यांच्या संयुक विद्यमाने नुकतीच 'आविष्कार २०२५' स्पर्धा यशस्वीरीत्या श्रीयश फार्मासिमध्ये आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत विविध शाखांतील विद्यार्थ्यांनीआपल्या नवकल्पना, संशोधन प्रकल्प आणि वैज्ञानिक कल्पनांची सादरीकरणे केली. ज्युरी सदस्यांनी प्रत्येक प्रकल्पाचे मूल्यमापन केलेआणिउत्कृष्ट प्रकल्पांना गौरविण्यात आले.''डॉ. किशोर राठोड, डॉ. शेशाम राजेश, डॉ. प्रणिता चिटणीस, डॉ. हुलास तोंडे, डॉ. दीपक कुलकर्णी, प्रा. अनिल पालवे, डॉ. सुरेश सुडके, डॉ. मिलिंद कांबळे, डॉ. विशाल गुरुमुखी, डॉ. मंगेश घोडके, डॉ. सचिन ढवळेआणि डॉ. दरकशान शेख यांनी प्रकल्पाचे मूल्यमापन केले. आविष्कार समन्वयक म्हणून प्रा. रश्मी शिवाजी तांबारे यांनी जबाबदारी पार पाडली. महाविद्यालयाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी आयोजनात मोलाची कामगिरी बजावली. विद्यार्थ्यांचा उस्फुर्त सहभाग, प्रत्येक विषयातील पारंगत ज्युरीसदस्य आणि त्यांचे मूल्यांकन यामुळे उत्तम इनोव्हेटिव्ह प्रकल्प आणि संशोधन घडत असल्याचे मत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया यांनी व्यक्त केले.'' या स्पर्धेच्या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचेअध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारीअधिकारी कर्नल जॉय डॅनियल यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सिडको परिसरात लवकरच शुभारंभ....
एक छान लोकेशन जिथे आपण --
बर्थडे पार्टी ▪ रिसेप्शन ▪ किटी पार्टी
▪ कॉन्फरन्स मिटिंग ▪ गेट - टू - गेदर
▪ सांस्कृतिक कार्यक्रम ▪ प्रकाशन समारंभ
▪ डोहाळ जेवण ▪ भिशी पार्टी व इतर...
हे व असे बरेचसे कार्यक्रम करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. एसी हॉल, लॉन, गार्डन, केटरिंग व्यवस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, साउंड सिस्टीम सर्व व्यवस्था एकाच ठिकाणी
विशेष : - प्रसन्न वातावरण - सुलभ पार्किंग व्यवस्था - सौजन्य सेवा - मध्यवर्ती ठिकाण - अगदी किफायतशीर दरात
सिद्धिविनायक
▪ हॉटेल ▪ लॉन ▪ इव्हेंट
संपर्क : 7498560019, 7588803314
Email phulambrikarrajendra@gmail. com


ऑनलाईन औषधोपचार
आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# भाई उर्फ पुल...

ज्योतिर्मय साहित्य
**(मागील अंकावरून)**

तिला आपल्या मुला विषयी काळजी असे, म्हणावे तर तिचा मुलगा चांगली १७ वर्षा पासून पेन्शन खात असून. पुढची २५ वर्ष आरामात पेन्शन खाण्याइतका टूणटूणीत होता.. सर्व प्रकार झाले पण कावळा काही पिंडाला शिवत नव्हता. शेवटी कोण तरी एक आजीबाई, एक मोठी बरणी आणि दोन पातेली आली ? तरच तुमची शाल जोडी बोहारणीला देईल, असे हात जोडून म्हंटल्याबरोबर कावळ्याने पिंड उचलला आणि सर्वांनी हुश्श केले.

पु. ल एकदा पर्यटनासाठी बँकॉकला गेले होते. बँकॉक हे शहर म्हणजे कालव्यांचे शहर. तेथील व्यापार पेठा आणि दुकाने सारे होडीत असे. भाजी पाल्या पासून ते किराणा भुसार माल या होड्यात भरलेला असे, ते पाहून पु. ल. म्हणाले, कधी जर घेणाऱ्याला माल वाईट मिळाला तर पैसे पाण्यात गेले म्हणण्याचा अधिकार फक्त याच लोकांना आहे. मी तर देवाला नेहमी मनातल्या मनात भांडत असतो, की देवा मला तू देशपांडे हे आडनाव असण्याचे भाग्य दिले मग पुलच्या जवळच्या वयात, त्यांच्या शेजारी का नाही आणून ठेवलेस? म्हणजे त्यांच्या सोबत राहून जिवंत हास्याची लयलूट करता आली असती. आणि असेही ते भाई नावाने प्रसिद्ध आहेत आणि मला मग भाऊ ही झालो असतो ना?




तर असे हे भाई. त्यांनी विपुल लेखन केले. त्यांचे सारी पुस्तके वाचलीच पाहिजेत कारण या सध्याच्या स्पर्धेच्या काळात मनाला आनंद देण्यासाठी अशी पुस्तके वाचली तरच आपण मनमुराद, दिलखुलास, खदखद, खळखळ आणि कधी कधी मुरक्या मुरक्या ही हसू शकतो, आणि नाचू ही शकतो. हो ना? हसताय ना? हसलंच पाहिजे. असं



गिरीश वसेकर ( देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

# आगगाडीशी जडले नाते

ज्योतिर्मय साहित्य



मित्रहो, माझे गाव बदनापूर. आता जालना जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असले तरी पन्नास साठ वर्षांपूर्वी औरंगाबाद जिल्ह्यातील आणि जालना तालुक्यातील एक छोटेसे खेडे होते.

मी बदनापूरच्या शाळेमध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या इयत्तेत असतांना आम्हाला बहुदा भूगोलाच्या पुस्तकात एक धडा होता. त्यात बदनापूर हे कृषी संशोधन केंद्र असलेले महत्त्वाचे गाव असल्याचा उल्लेख होता. तसेच जालना हे मोठे व्यापारी शहर असल्याचाही उल्लेख होता.

बदनापूर आणि जालन्यामध्ये केवळ एकोणीस किलोमीटरचे अंतर. जणू घर अंगणच.

मी मार्च १९६६ मध्ये बदनापूरच्या जि. प. प्रशालेतून पहिल्या श्रेणीत एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यावर जालन्याच्या जे. ई. एस महाविद्यालयात पी. यू. सी. सायन्सला प्रवेश घेतला आणि माझा आणि आगगाडीचा संबंध सुरु झाला. पी. यु. सी. पासून बी एस्सी स्पेशल फिजिक्स ची पदवी मिळेपर्यंत सलग चार वर्षे बदनापूर ते जालना नियमितपणे रेल्वेने जाणे येणे केले. सकाळी सात वाजून पाच मिनिटांनी बदनापूरच्या स्टेशनवर येण्याची पॅसेंजर ट्रेनची वेळ असे. बहुदा ती वेळेवरच येत असे. तसेच सायंकाळी ५.२० वाजता जालन्याहून परतीची गाडी पूर्णा ते मनमाड पॅसेंजर होती. तीसुद्धा वेळेवरच येत असे. त्या चार वर्षांच्या काळातील रेल्वेविषयीच्या अनेक आठवणी हृदयाच्या कोपऱ्यात साठवून ठेवलेल्या आहेत. त्यातल्या फक्त दोन आठवणी इथे सांगतो.



उद्धव भयवाळ
छ. संभाजीनगर मो ८८८८९२५४८८

बदनापूर ते जालना विद्यार्थ्यांसाठीचा सवलतीच्या दरातील मासिक पास चार रुपये तर त्रैमासिक पास दहा रुपये होता. त्यासंबंधीच्या प्रमाणपत्रांचे पुस्तक दक्षिण मध्य रेल्वेच्या सिकंदराबाद कार्यालयाकडून कॉलेजला येत असे. कॉलेजकडून प्रमाणपत्र घेऊन रेल्वे स्टेशनवर दिले की सवलतीच्या दरात विद्यार्थ्यांना पास मिळत असे. बहुतेक मी बी.एस्सी प्रथम वर्षाला असतांना रेल्वेने भाडेवाढ केली होती. **(क्रमशः)**

# कर्ज बेबाकीतून त्यांना वगळा

**ज्योतिर्मय साहित्य**

२०१७ ला शेतकऱ्यांचा संप झाला होता. संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलनाचे लोन पसरले होते. त्या वेळी मी पहिल्यांदा जाहीर भूमिका घेतली होती की, सरकारी पगारदार आणि आयकर भरणारे याना कर्ज-बेबाकी देऊ नये. अशा घटकांना कर्ज-बेबाकी देणे हा तिजोरीवर दरोडा आहे. त्याना दिले जाणारे पैसे शेतकऱ्याना द्या. त्या वेळेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच होते. त्यांनी माझ्या म्हणण्यातील तत्व मान्य केले पण केवळ हे दोन घटक न धरता त्यांनी लांबलचक यादी जोडली. व वगळलेल्यांचे पैसे शेतकऱ्यांना दिले नाहीत. त्यामुळे त्या निर्णयाच्या विरोधात आक्रोश निर्माण झाला.

का वगळावे?

मी तालुक्याच्या गावात राहतो. महसूल मधील एका मित्राने सांगितले की, गेल्या दोन वर्षांत आमच्या गावातील पाच डॉक्टरांनी सुमारे दोनशे एकर जमीन विकत घेतली. शेतीच्या उत्पन्नावर आयकर नाही म्हणून अशी तजवीज केली जाते. शिवाय रियल इस्टेट म्हणूनही जमीन हे महत्वाचे कलम आहे. तुमच्या भागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांकडे किती जमीन आहे ते पहा. नदीच्या काठच्या जमिनी असो की शिवारात हिरवी कांच दिसणारी शेती पुष्कळदा अशा भ्रष्ट लोकांची असते. हे गौडबंगाल लक्षात येईल.

जिल्ह्याच्या एम.आय.डी.सी मध्ये उद्योग असलेले एक कारखानदार सांगत होते की, आमच्या मॉर्निंग ग्रुप मध्ये काही कारखानदार आहेत, काही डॉक्टर आहेत, काही अधिकारी आहेत तर एक जण साखर कारखान्याचे चेयरमनही आहेत. हल्ली आमच्याकडे 'कोणाला किती पैसे आले?' यावरच चर्चा होते. कोणी म्हणते, दोन लाख आले, कोणी म्हणते ८० हजार आले. ते पुढे म्हणाले, अशी मदत घेण्याची मला लाज वाटते. आमच्या सारख्यांना का पैसे देता? जे खरे गरजवंत आहेत त्याना द्या. त्यांचे म्हणणे एका प्रामाणिक कारखानदाराचे आहे. मागे हाय कोर्टातील वकील महेश भोसले यांनी मला कर्ज माफी नको, असे जाहीर केले होते.

सरकारी पगार घेणारी व्यक्ती दुसरा व्यावसाय करू शकत नाही. असा कायदा आहे. म्हणून त्याला दुकान काढता येत नाही, गिरणी चालवता येत नाही. पुस्तक प्रकाशन करून विकता येत नाही, म्हणून अनेक सरकारी पगारदार लोक प्रकाशक म्हणून बायकोचे किंवा आईचे नाव टाकतात. माझा मुद्दा त्यांनी काय करावे हा नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की ते जर इतर व्यवसाय करू शकत नाहीत तर ते शेती कशी करतात? शेती हा व्यवसाय नाही का? शेती वंश-परंपरेने आली म्हणून काय झाले? वंश-परंपरेने आलेली शेती करायची असेल तर मग नोकरी का करता? नोकरी करायची असेल तर शेती का? ही सूट कोणी दिली? का दिली? बरे त्यावर ह्यांना कर्जमाफी आणि अनुदानेही हवीत. वेतन आयोगही घेणार आणि शेतकरी म्हणून दुहेरी लाभ ही उपटणार. हे कसे चालेल?



अमर हबीब, अंबाजोगाई
किसानपुत्र आंदोलन
मो. ८४११९०९९०९

सरकार कारखानदारांचे लाखो कोटीचे कर्ज राईट ऑफ करते मग शेतकऱ्यांमध्ये भेदाभेद का? असा प्रश्न विचारला जातो. मी या प्रश्ना मागची भावना समजू शकतो. असा प्रश्न विचारणारा प्राध्यापक असेल तर लक्षात घ्या, त्याना दोन गोष्टी माहित नाहीत. एक तर सगळ्या कारखानदारांची थकबाकी राईट ऑफ केली जात नाही. सरकारच्या खास मर्जीतील निवडक कारखानदारांचीच थकबाकी राईट ऑफ केली जाते. तेथेही सरसकट नसते. बगलबच्च्यांची कर्जे राईट ऑफ करणे ही बाब मला जास्त गंभीर वाटते. सरकारने केलेला हा पक्षपात घातक आहे. मुठभर कारखानदारांना मार्ग मोकळा करणे देशाच्या हिताचे असणार नाही.

दुसरी बाब 'शेतकरी तितुका एक एक' म्हणजे 'शेतकरी' तितुका एक एक. बिगर शेतकरी आणि शेतकरी तितुका एक एक नव्हे. यासाठी तुम्हाला शेतकरी या शब्दाची व्याख्या समजावून घ्यावी लागेल. सातबारा आहे म्हणून त्याला शेतकरी म्हणायचे का? असे केले तर अनेक पुढारीच काय दारूचे गुत्तेवाले देखील त्या व्याख्येत येतील. शेतकरी या शब्दाची व्याख्या साधी आहे. ज्याच्या उत्पन्नाचे साधन शेती आहे, तो शेतकरी. शेतकरी तितुका एक एक म्हणजे ज्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे ते सगळे एक आहेत. त्यात मजूर, बटाईदार, संत्र्याचा- कापसाचा, बागाईतदार- कोरडवाहू, मराठवाड्यातला- पश्चिम



महाराष्ट्रातला, ह्या जातीचा, त्या जातीचा- ह्या धर्माचा- त्या धर्माचा असा भेदाभेद करू नका. ज्यांचे ज्यांचे शेती हे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे ते सगळे शेतकरी होत. ज्याना सरकारी पगार मिळतो, ज्याना इतर व्यवसायातून उत्पन्न मिळते, जे राजकारणात कमाई करतात ते कसे शेतकरी होतील.

काहींचे म्हणणे असे की, शेती तोट्यात आहे, ती कोणाचीही असली तरी तोट्यात आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे तोट्यात आहे. पगारदार असो की व्यावसायिक त्यांना सरकारने नुकसान भरपाई दिली पाहिजे. ह्या मित्रांनी हे लक्षात घ्यावे की, नोकरदारांना पगार मिळतो, आयकर भरणारे लोक काही कमी कमवत नाहीत, आपली कमाई लपवण्यासाठी ते जमिनी ठेवतात किंवा विकत घेतात. माझा मुद्दा हा आहे की, शेतीच्या लुटीचा मोबदला त्यांना त्यांच्या व्यावसाय आणि नोकरीत मिळतो. त्यामुळे त्यांना तक्रार करायला जागा नाही.

सोपा मार्ग

सरकारी पगारदार आणि आयकर भरणारे यांना वगळणे अवघड नाही. त्यांची यादी करायला घरोघर जाण्याची आवश्यकता नाही. या दोन्ही याद्या काही तासात सरकारला मिळू शकतात. जास्ती जास्त आठ दिवस लागतील. सरकारी पगारदारांची यादी खुद्द सरकारकडे असणारच आहे. आयकर भरणाऱ्यांची यादी देखील महाराष्ट्रातील आयकर खात्याच्या वेबसाईट वर मिळू शकते. फक्त हेच दोन घटक सुरुवातीला वगळले पाहिजेत. माझ्या माहितीनुसार सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या १७ लाख आहे व आयकर भरणाऱ्यांची संख्या जवळपास एक कोटी आहे. या एक कोटी मध्ये सरकारी कर्मचारी समाविष्ट असणार आहेत. ही यादी एकत्र आली की त्या पैकी किती जनांच्या नावे सातबारा आहे, हे सहज काढता येईल. आता सात-बारा देखील ऑनलाईन उपलब्ध आहे. एका बाजूला राज्य पातळीवर ही माहिती तयार करावी दुसऱ्या बाजूला महसूल कर्मचाऱ्याकडून माहिती मागवून घ्यावी. आयकर भरणाऱ्यांची यादी स्थानिक महसूल यंत्रणेकडे देऊन त्यात्या नावा वरील क्षेत्र कळू शकेल. सरकारने ठरवले तर ही माहिती आठ दिवसात गोळा होईल.

वरील यादीत अनेक असे कर्मचारी आणि आयकर भरणारे लोक असतील की ज्यांच्या नावाने जमीन असणार नाही. हा आकडा किती असले हे आज नक्की सांगता येत नाही.

कर्जबेबाकी सोबत मदतही करा

शेती हे मुख्य उत्पन्नाचे साधन असणारे किती कुटुंब महाराष्ट्रात असतील? याचा नेमका आकडा सरकारकडे नसावा, हे शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. शेतकऱ्यांप्रती सरकारला कितपत आस्था आहे, याचा हा पुरावा आहे. मी सरकारला सीलिंगच्या जमिनी बद्दल माहिती मागितली होती. त्याबद्दलही हीच अनास्था दिसून आली. खरे तर सरकारची ही अनास्था चिंतेची बाब मानली पाहिजे. सरकार एखादे काम करीत नाही, तेंव्हा विद्यापीठा सारख्या स्वायत्त संस्थांनी पुढे आले पाहिजे. हे काम कोणत्याच विद्यापीठाने आज पर्यंत का केले नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या

स्वातंत्र्य पूर्व काळात होत होत्या. नंतरही सातत्याने होत आल्या आहेत. १९६२ ला प्रमाण वाढले म्हणून पी एचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्याचा अभ्यास केला. १९८६ साली साहेबराव करपे कुटुंबियांच्या आत्महत्येने सारा महाराष्ट्र हादरला. त्या नंतर न्यायालयाच्या आदेशाने सरकारने शेतकरी आत्महत्याची वेगळी नोंद घ्यायला सुरुवात केली. सुमारे पाच लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या उत्पाताचा सरकारवर परिणाम झाला नाही. पण शेतकरी मात्र जागे झाले. कोण्या नेत्याने सांगितले म्हणून नव्हे तर स्वत: शेतकऱ्यांनी ठरवले की, आपली पुढची पिढी शेतीत ठेवायची नाही. याच काळात खुलीकरण आले व इंडीयाचे दार किलकिले झाले. शेतकऱ्यांच्या मुला-मुलींनी फार मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले. त्यामुळे आज 'शेती हे उत्पान्नाचे मुख्य साधन' असलेली कुटुंबे खूप कमी झाली आहेत. हे वास्तव नीट समजावून घेतले पाहिजे.

आत्महत्या करणारी कुटुंबे तीच आहेत, ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे. हे लक्षात घेऊन माझी सरकारला सूचना आहे की, सरकारने कर्जबेबाकी तर करावीच. त्याच बरोबर सरकारी पगारदार व आयकर दात्यांना दिली जाणारी जी रक्कम शिल्लक राहणार आहे ती त्या कुटुंबामध्ये वाटावी ज्यांचा शेती हाच उत्पन्नाचा मुख्य आधार आहे. अशी रक्कम वाटल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या टळू शकतील. कर्ज-बेबाकी आणि मदत करून थांबू नका. त्याच्या पुढे जाऊन कमाल शेतजमीन धारणा कायदा आणि आवश्यक वस्तू कायदा हे जीवघेणे कायदेही रद्द करावे लागतील.

# आदिवासी:आज आणि उद्या

**ज्योतिर्मय साहित्य**

पार्श्वभूमी : आदिवासी समाज म्हणजे आदि (मूळ) आणि वासी (निवासी) या शब्दांनी बनलेला, जगातील आणि विशेषतः भारतातील मूळ रहिवाशांचा समूह होय. आदिवासी या शब्दातूनच त्यांची अद्वितीय ओळख स्पष्ट होते-ते एखाद्या भूभागाचे किंवा क्षेत्राचे सर्वात प्राचीन आणि मूळ मालक आहेत. भारतीय संविधानात त्यांना अनुसूचित जमाती (शेड्युल ट्राईब - ) म्हणून ओळखले जाते. या समाजाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे निसर्गाशी असलेले अतूट आणि पूजनीय नाते होय. ते जल, जंगल आणि जमीन यांना केवळ संसाधने नाही, तर आपल्या जीवनशैलीचा आणि आस्थेचा अविभाज्य भाग मानतात. त्यांची संपूर्ण संस्कृती प्रकृतिपूजेवर आणि टिकाऊ जीवनशैलीवर आधारित आहे. आदिवासी समाज समतामूलक असतो. यामध्ये वर्णभेद, वर्गभेद किंवा मोठे सामाजिक स्तरीकरण कमी आढळते. त्यांचे ज्ञान आणि इतिहास मौखिक परंपरा, कला, नृत्य आणि लोककथांच्या माध्यमातून एका पिढीतून दुसऱ्या पिढीत हस्तांतरित होतो. वारली (वारली), गोंड यांसारख्या त्यांच्या चित्रकला शैली जगभर प्रसिद्ध आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येत त्यांचा वाटा सुमारे ८.६% आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ते जंगलात स्वायत्तपणे जीवन जगत होते, पण आज ते विस्थापन, जमिनीचे प्रश्न, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या अनेक सामाजिक-आर्थिक आव्हानांचा सामना करत आहेत.



**आदिवासी समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये**

आदिवासी समाजाचे जीवनमान इतर समाजापेक्षा वेगळे आणि खास असते. त्यांची काही प्रमुख वैशिष्ट्ये

निसर्गाशी नाते (प्रकृतिपूजक) : आदिवासी हे निसर्गाचे पुजारी आहेत. त्यांच्यासाठी जंगल, डोंगर, नद्या या केवळ वस्तू नसून त्या देवता आहेत. त्यांचे सण-उत्सव, श्रद्धा आणि जीवनशैली पूर्णपणे निसर्गावर आणि शेती-पीक चक्रावर आधारित असते.

सामूहिक जीवन: आदिवासी समाज सामुदायिक आणि सहकार्यावर आधारित असतो. श्रमविभागणी लिंगावर (स्त्री-पुरुष) आधारित असते, व्यावसायिक-सामाजिक गटवारीवर नाही. त्यांच्यात समान रक्तसंबंधावर आधारित समूह आणि प्राथमिक संबंधांचे प्राबल्य आढळते.

साधे जीवन: त्यांचे जीवन अतिशय साधे, प्रामाणिक आणि गरजा मर्यादित ठेवणारे असते. त्यांच्या उद्योगात तांत्रिक आणि धार्मिक विधींचा जवळचा संबंध असतो.



प्रा.भगवान केशव गावित
कार्याध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉई फेडरेशन, पुणे जिल्हा
मो.नं. ९३०७००५४३१

स्वातंत्र्य आणि स्वयंपूर्णता : हा समाज अनेकदा स्वावलंबी कुटुंबांच्या संघांनी बनलेला असतो आणि पारंपरिकरित्या ते राजकीय पातळीवर संघटित झालेले नसतात (नातेसंबंधांवर समाजनियंत्रण चालते).

**आदिवासी विरुद्ध वनवासी**

आदिवासी हा शब्द आदि आणि वासी या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे. याचा अर्थ आधीपासून किंवा आदिम कालखंडापासून वास करणारा समाज असा होतो. भारतात कुठेही पाहिले तरी हा समाज बहुतांशी डोंगरदऱ्यांमध्ये राहतो. यामुळे काही विशिष्ट संघटना त्यांना वनवासी असे म्हणतात. पण हा शब्दच्छल असून खोडसाळपणा आहे. आदिवासी या शब्दाला सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ आहेत. आदिमत्त्व हे त्यांचे एक महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. तर वनवासी या शब्दाला फक्त भौगोलिक संदर्भ आहे. म्हणून आदिवासी हाच शब्द वापरणे योग्य आहे.

**वनाधिकार आणि विस्थापन**

सर्वत्र भारतभर आदिवासी समाज डोंगरदऱ्यांमध्ये, रानावनामध्ये राहतो. त्यांचे संपूर्ण जीवन हे वनांवर, जंगलामध्ये मिळणाऱ्या नैसर्गिक साधनसामुग्रीवर- ज्यात जंगलातील लाकडे, मोहाची फुले, तेंदूची पाने, शिकार इत्यादीवर अवलंबून होते. परंतु इंग्रजांनी जेव्हा १८६४ साली वन कायदा लागू केला, तेव्हापासून आदिवासींची जगण्याची साधने कायमची हिरावली गेली. याला आता १५६ पेक्षा जास्त वर्षे लोटून गेली आहेत. २००६ मध्ये वनहक्क कायदा केला गेला. परंतु येथील राजकीय छडयंत्र आणि नोकरशाहीच्या असंवेदनशील वृत्तीमुळे अजूनही काही लोकांना त्यांना त्यांचे हक्क मिळू शकलेले नाहीत.

**संघर्ष आणि इतिहासाची उपेक्षा**

आर्य-अनार्य संघर्षामध्ये अनार्यांची पीछेहाट होऊन सपाट व सुपीक भूमीवरून भारतात सर्वत्र आदिवासी बांधवांना डोंगराळ भागात आश्रय घ्यावा लागला. इंग्रजांच्या काळात वन कायद्याने ते उध्वस्त झाले. हजारो वर्षे आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून दूर राहिला. अनेक राजसत्ता येऊन गेल्या, पण त्यांची दखल जास्त कुणी घेतली नाही. इंग्रजांविरुद्ध सर्वात जास्त लढे व बलिदान आदिवासींनी दिले. पण इतिहास लिहिणाऱ्या पक्षपाती लोकांनी त्याची दखल घेतली नाही. म्हणून आज समाजासमोर स्वजातीय, स्ववंशीय आदर्श खूप कमी आहेत. धरती आबा बिरसा मुंडा, राघोजी भांगरे यांचे थोर कार्य कोणत्याही अभ्यासक्रमात नसल्याने आज तरुण पिढी या आदर्शापासून वंचित आहे. ज्या समाजाला इतिहास नसतो किंवा इतिहास असला तरी तो नवीन पिढीला माहित नसतो, तो समाज स्वत्व गमावून बसलेला असतो. स्वतःबद्दल, स्वतःच्या समाज, संस्कृती याबद्दल एक हीनत्वाची भावना त्यांच्यात निर्माण होते व तो परधर्म, परसंस्कृतीला शरण जातो. आज मला आदिवासी समाजाबद्दल हेच घडताना दिसून येत आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचा समावेश केलेला आहे. त्यांनी एक व्यक्ती, एक मत याचा राज्यघटनेत समावेश केल्यामुळे आज आदिवासी पुरुष व स्त्रिया या सर्वांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सामील होता आले आहे. आज गाव, पाडे, तालुका, जिल्हा, राज्य, केंद्र स्तरांवर आदिवासी नेतृत्व उभे राहिलेले आहेत... ते केवळ आणि केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे. आज आदिवासी समाजाला शिक्षण, नोकरी व राजकारणामध्ये जे प्रतिनिधित्व, राखीव जागा, आरक्षण, शिष्यवृत्तीची सोय इत्यादी गोष्टी मिळालेल्या आहेत, याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे जाते. आपल्याला ते न भांडता त्या महामानवाने सहज देऊन टाकले आहे व काही जण अजूनही त्यांना त्यांचे श्रेय देत नाहीत, त्यांच्या विचारांनुसार चालत नाहीत, ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.

(क्रमशः)

# गोड प्रश्नाचं कडू उत्तर

**ज्योतिर्मय साहित्य**




एकदा भर उन्हात आमच्या घरी पाहुणे आले. त्यांनी येताना कृष्णासाठी मोठी कॅडबरी आणली होती. तो साधारण पाचेक वर्षांचा असेल

आम्ही स्वतःहून कधी त्याला कॅडबरी आणून दिली नव्हती. त्यामुळे त्याला कॅडबरीचं भारी आकर्षण होतं. तर त्या पाहुण्यांनी त्याला जवळ बोलावलं आणि त्याच्या हातात भली मोठी कॅडबरी ठेवली. वातावरणातील उष्णतेमुळे ती थोडी वितळली होती. ही कॅडबरी थोडी वेगळी आहे, हे त्याच्या लक्षात आलं पण मी त्याला सांगितलं की थोडा वेळ फ्रीजमध्ये ठेव म्हणजे तुला ती छान पद्धतीने खाता येईल. ही गोष्ट त्याला पटली आणि लगेचच तो कॅडबरी फ्रीजमध्ये ठेवायला तयार झाला. थोड्या वेळाने त्याला त्या कॅडबरीची आठवण आली आणि त्याने ती कॅडबरी मला मागितली. मी दिली. त्या कॅडबरीची घनअवस्था पाहून त्याला खूप आनंद झाला आणि त्यानं मला प्रश्न विचारायला सुरुवात केली, 'आई, ही कॅडबरी कशापासून बनते? मग ती इतकी का छान लागते ? आणि सगळ्यांना आवडते तर मग तुम्ही मला का आणून देत नाही? अशी प्रश्नांची सरबत्ती सुरू झाल्यावर त्याला नीट समजावून सांगणं हे माझं काम होतं. मग कॅडबरी खाण्यानं दात किडतात हे मी त्याला सांगितलं. मग जर कॅडबरी खाण्यानं दात किडत असतील तर पाहुण्यांनी मला ती का आणून दिली? असं त्यानं मला विचारलं. मी त्याला समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही आणि मी ती वेळ मारून नेली. थोड्यावेळाने तो म्हणाला, 'आई त्या पाहुण्यांचे माझ्यावर खूप प्रेम असणार म्हणून त्यांनी माझ्यासाठी ही कॅडबरी दिली' मी विचारलं 'हे तुला कसं कळलं?' तर त्यानं सांगितलं 'कॅडबरी डेअरी मिल्क टू समवन यु लव्ह !'



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

मला लगेचच आठवलं. टीव्हीवर कॅडबरीची जाहिरात बघून त्याची टॅगलाईन त्याने इथं वापरली होती. मला फार नवल वाटलं. पण पाहुण्यांचं त्याच्यावर असलेलं प्रेम, त्याला आवडणारी कॅडबरी, दातांना लागणारी कीड या सगळ्याचं गणित त्याच्या डोक्यात काही जुळत नव्हतं. दात खराब करणारी कॅडबरी आपल्यावर प्रेम करणारे लोक का बरं आणून देत असतील? हा त्याचा प्रश्न अंतर्मुख करणारा होता. अशावेळी वैष्णवीनं परिस्थितीचा ताबा घेतला. तिनं तिच्या कपाटातून एक फाईल काढली आणि एक चित्र कृष्णाला दाखवलं. ते चित्र तिनं तिच्या लहानपणी काढलेलं. ते चित्र होतं एका कॅडबरीचं आणि त्या चित्रातील कॅडबरीत एक अळी होती. ते चित्र दाखवून वैष्णवीनं त्याला घरच्या ताज्या, स्वच्छ आहाराचं महत्व तिच्या भाषेत सांगायला सुरुवात केली. तिचं म्हणणं कृष्णाला लगेचच पटलं

एवढ्याशा गोष्टीतून मनोविज्ञानाचे किती गहन अर्थ उलगडू शकतात, हे कृष्णाच्या या प्रसंगाने दाखवून दिलं. पाच वर्षांचा कृष्णा, त्याची निरीक्षणशक्ती आणि निरागस तर्क, पालकांचा समजावण्याचा प्रयत्न आणि शेवटी मोठ्या बहिणीचा संवेदनशील हस्तक्षेप या सगळ्याने एक नाजूक पण विचार करायला लावणारा पट तयार होतो. कृष्णाला ती कॅडबरी मिळाली तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद म्हणजे त्या वयातील इच्छा पूर्ण झाल्याचा क्षण. मुलांना कधी वस्तूचा आर्थिक किंवा सामाजिक संदर्भ कळत नाही, त्यांना फक्त आकर्षण आणि समाधान हेच कळतं. टीव्हीवरील जाहिरातींतून त्याच्या मनात ''कॅडबरी'' हे आनंद, प्रेम आणि आपुलकीचं प्रतीक म्हणून आधीच कोरलं गेलं होतं आणि म्हणूनच पाहुण्यांनी ती त्याला दिली तेव्हा त्याला वाटलं ''माझ्यावर त्यांचं खूप प्रेम आहे.''

(क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559